**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **भाजपचा जाहीरनामा हे विकासाचं गॅरंटी पत्र असल्याचं, भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं, चिमूरच्या सभेत प्रतिपादन.**
- **संविधान वाचविण्या सोबतच, शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम सत्तेत आल्यावर आपलं सरकार करेल असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं गोंदियातील प्रचार सभेत आश्वासन.**
- **विदर्भात आज स्टार प्रचारकांच्या सभांची गर्दी; स्मृति इराणी, योगी आदित्यनाथ, सुप्रिया सुळे यांच्या सभा आयोजित.**
- **अभियंते हे आधुनिक समाजाचे शिल्पकार असल्याचं पद्मश्री प्रा.दीपक फाटक यांचं भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था नागपूरच्या चौथ्या दीक्षांत समारंभात प्रतिपादन.**

**पंतप्रधान मोदी सभा चिमूर**

भाजपचं संकल्पपत्र नसून आमचं गॅरंटी पत्र आहे. विकासाच हे कार्य निरंतर चालू ठेवण्यासाठी भाजप, महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असं आवाहन, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर इथं, भाजप महायुतीचे उमेदवार, किर्तीकुमार भांगडीया यांच्या प्रचार सभेत, भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मागील अडीच वर्षात, महाराष्ट्रात विकास कामाचा वेग वाढला आहे. राज्यात शेती, सिंचन, घर, पिण्याचं पाणी, डिजिटल कनेक्टिव्हिटी, दर्जेदार रस्ते, लोहमार्ग, वंदेभारत एक्सप्रेस, रेल्वे स्थानकाचं आधुनिकरण अशी विकास कामं, मोठ्या प्रमाणात होत आहे असं, मोदी म्हणाले. दरम्यान, सोयाबीन शेतकऱ्यांसाठी सरकार करत असलेल्या उपाय योजनांचा त्यांनी प्रामुख्यानं उल्लेख केला

***साथियो, हमारी सरकार सोयाबीन किसानों को संकट से उभरणे के लिए भी आर्थिक सहायता दे रही है. सोयाबीन किसानों को अलग से पाच हजार रुपये दिए जा रहे हैं. महायुति की सरकार ने सोयाबीन का न्यूनतम समर्थन मूल्य छे हजार प्रती क्विंटल***

***करणे का भी वायदा किया है. हमने प्याज निर्यात शुल्क को भी कम किया है, ताकि हमारे किसान भाइयों की आय बढे.***

मोदींच्या चिमूर सभेत, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, खासदार प्रफुल पटेल, राज्याचे वन आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी खासदार रामदास तडस, महायुतीचे उमेदवार नेते आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येनं उपस्थिती होती. चिमूरच्या क्रांतीभूमीत आज दुसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानांचं आगमन झालं. याआधी पंतप्रधान नरसिंहराव, जवळपास बत्तीस वर्षांपूर्वी १६ ऑगस्ट रोजी, शहीद क्रांती दिनाच्या कार्यक्रमात आले होते. सोलापूर आणि पुणे इथं देखील, आज, मोदी यांच्या प्रचारसभा होणार आहेत.

**राहुल गांधी सभा**

राजकारणात आज द्वेष पसरविला जात असून, आम्ही मात्र प्रेमाची दुकानं उघडून बसलो आहोत असं प्रतिपादन, लोकसभेचे विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी आज, गोंदियात केलं. गोंदिया जिल्ह्यातील महाविकास आघाडी आणि काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ, त्यांनी आज सभा घेतली. महात्मा गांधी, फुले-आंबडेकर आणि शिवाजी महाराजांसारख्या, महापुरुषांचे विचार, संविधानात आहेत. त्यामुळ हे संविधान वाचविणं आवश्यक आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील सरकार, गरीब, सामान्य आणि शेतकऱ्यांचा विचार करत नाही. ओबीसींची लोकसंख्या ५० टक्के आहे पण त्यांची व्यवस्थेतील भागीदारी अत्यंत कमी आहे, त्यामुळ आम्ही सत्तेत येताच जाती आधारित जनगणना करू असं आश्वासन, राहुल गांधी यांनी दिलं. याशिवाय शेकऱ्यांना दिलासा देण्याचं काम आपण करू असं ते म्हणाले -

***किसानों को तीन लाख रुपये तक का कर्जा माफ होगा, और चाहे वो और आपकी प्रोक्यूरमेंट होगी, तो एमएसपी पे आपकी प्रोक्यूरमेंट होंगी। धान के किसान हो, कपास या सोयाबीन, मैं जानता हूं आपके साथ क्या होता है, आपको सही दाम नहीं मिलता है. हमारी पूरी कोशिश होगी कि चाहे ओ धान के किसान हो, सोयाबीन के किसान हो, कपास के किसान हो, आपको मार्केट में सही रेट मिलेगा.***

दरम्यान, राहुल गांधी यांची, बुलढाणा जिल्ह्यातल्या, चिखली मतदारसंघातली आज दुपारी नियोजित सभा रद्द झाली. विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळ, आपण

चिखलीला येऊ शकलो नाही असं, राहुल गांधी यांनी, समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**अन्य प्रचार सभा(विदर्भ)**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच पक्षांचे ज्येष्ठ नेते झंझावाती दौरे करुन आपापल्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांना मत देण्याचं आवाहन मतदारांना करत आहेत. शिवसेना नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर इथं नुकतीच प्रचारसभा झाली. त्यांनी महायुतीचे उमेदवार अभिजित अडसूळ यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. अमरावती जिल्ह्यात सिट्रस इस्टेट उभं करण्यासाठी राज्य सरकारनं प्रोत्साहन दिल्याचं शिंदे यावेळी म्हणाले. राज्य सरकारने गेल्या अडीच वर्षांमध्ये महिलांना आणि शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी अनेक योजना आणल्या आणि पुढंही त्यांचं कल्याण आम्ही करू असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथील महायुती उमेदवाराच्या प्रचारार्थ जाहीर सभेत केलं. आमच्या सरकारने शेतकऱ्यांसाठी 10 सुत्री कार्यक्रम सुरू केला. आमचं सरकार हे अन्न, वस्त्र आणि निवारा देणारं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. मध्य-नागपूरचे उमेदवार प्रवीण दटके आणि दक्षिण-नागपूरचे उमेदवार मोहन मते यांच्यासह महायुतीच्या सर्व उमेदवारांसाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा आज नागपूरच्या रेशीम बाग चौक इथं होणार आहे. दरम्यान योगी आदित्यनाथ यांनी महायुतीतील भाजपचे अचलपूर विधानसभा मतदार संघाचे उमेदवार प्रवीण तायडे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेतली तसाच अकोला पश्चिम मतदारसंघात देखील त्यांची सभा झाली. महायुतीच्या डबल इंजिन सरकारनं राबविलेल्या विविध योजना मार्फत प्रत्येक शहरापर्यंत विकास पोहचल्याच योगी यावेळी म्हणाले. वरोरा भद्रावती इथं महाविकास आघाडीचे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार प्रविण काकडे यांच्या प्रचारादरम्यान खासदार प्रतिभा धानोरकर यांनी विरोधकांचा समाचार घेतला. तर मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भूयार यांच्या प्रचारार्थ मोर्शी इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत पदयात्रा काढण्यात आली. राज्यातील महायुती सरकारच्या काळात महिलांवरील अत्याचारात वाढ झाल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज गडचिरोली जिल्ह्ययातील आलापल्ली इथं केली. अहेरी विधानसभा क्षेत्रातील महाविकास

आघाडीच्या उमेदवार भाग्यश्री आत्राम यांच्या प्रचारार्थ आलापल्ली येथे आयोजित जाहीर सभेत सुळे यांनी महायुती सरकारवर टीकास्त्र सोडले. महाविकास आघाडीचे सरकार आल्यास महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना दरमहा ३ हजार रुपये देण्यात येणार असून, कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करणार असल्याचंही सुळे म्हणाल्या. दरम्यान, नागपुरात भाजप नेत्या माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची उमरेड मतदारसंघात सायंकाळी सभा होणार आहे.

**IIIT नागपूर**

अभियंते हे आधुनिक समाजाचे शिल्पकार आहेत, जे दैनंदिन जीवनाला आकार देणाऱ्या पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानाची निर्मिती करतात असं प्रतिपादन, आय.आय.आय.टी.मुंबईतील, संगणक विज्ञान अभियांत्रिकी विभागाचे निवृत्त प्राध्यापक, पद्‌मश्री प्रा.दीपक फाटक यांनी केलं. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर इथं आज, संस्थेचा चौथा दीक्षांत समारंभ साजरा झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून, फाटक बोलत होते. या दीक्षांत समारंभात, संस्थेनं ३६४ पदव्या प्रदान केल्या ज्यात सहा पीएच.डी., २५ मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी इन इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, ५० पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी आणि २८३ बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी या पदव्यांचा समावेश आहे. अभियांत्रिकी अभ्यास विद्यार्थ्यांना, विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी, कौशल्ये आणि ज्ञानानं सुसज्ज करत असं, संस्थेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, रवी शर्मा यावेळी म्हणाले. या दीक्षांत समारंभास पाचव्या उत्तीर्ण बॅचचे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि देशभरातील इतर भागधारक, उपस्थित होते.

**कार्तिकी एकादशी**

कार्तिकी एकादशी आज साजरी होत आहे. पंढरपूर इथं श्रीविठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा विभागीय आयुक्त, डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आली. दरवर्षी शासकीय महापूजा, राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येते मात्र, यंदा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यानं, ही महापूजा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आली. लातूर जिल्ह्यातले सागरबाई आणि बाबुराव सगर या दाम्पत्याला प्रथम पूजेचा मान मिळाला. सगर दाम्पत्य, गेली चौदा वर्ष पंढरीची वारी करत आहे. कार्तिकी एकादशी निमित्त, पंढरपूरमध्ये तीन लाखाहून

अधिक भाविक दाखल झाले आहेत. नागपूरच्या विविध मंदिरांत एकादशी निमित्त, धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नागपूरनजीक धापेवाडा इथं, सुप्रसिद्ध विठ्ठल मंदिरात, आज सकाळपासून, भाविकांनी दर्शनासाठी रीघ लावली असून, धापेवाड्याला विदर्भातील पंढरी असं म्हटलं जात.

**जाहिरात दक्षता**

भारत निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकिच्या मतदान दिवसापूर्वी आणि मतदानाच्या दिवशी मुद्रित माध्यमातून कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळ कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळ निवडणूक प्रक्रियेला अडथळा येईल अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत, याबाबत मुद्रित माध्यम आणि सर्व संबंधितांना दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोगाच्या या निर्देशांचं पालन करण्याचं आवाहन, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आलं आहे.

**आठवडी बाजार**

२० नोव्हेंबर रोजी अर्थात विधानसभा निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून, वर्धा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात ज्या शहरी आणि ग्रामीण भागातील गावामध्ये बुधवार बाजार भरविण्यात येतो त्याठिकाणी, हा बाजार इतर सोईच्या दिवशी भरविण्याचे आदेश, जिल्हादंडाधिकारी, राहुल कर्डिले यांनी, निर्गमित केले आहे.

*****